## विभाग - सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

वेबसाईट - www.mahasahakar.maharashtra.gov.in

### १०० दिवस कार्यक्रमाची सद्यस्थिती निहाय माहिती

| अ.क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण/अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय/फोटो/इ. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| सहकार उपविभाग | | | | |
| १ | सहकार विभागामार्फत ऑनलाईन सेवा उपलब्ध करणे. | पूर्ण | • लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत ५ सेवा अधिसूचित केल्या आहेत.<br>१) सहकारी संस्था नोंदणी<br>२) उपविधी दुरुस्ती<br>३) सावकारी परवाना देणे<br>४) सावकारी परवाना नुतणीकरण<br>५) सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मानीव अभिहस्तांतरण<br>या सेवा आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध आहेत. या सेवांपैकी सहकारी संस्था नोंदणी व उपविधी दुरुस्ती या मॉड्युल्समध्ये आणखी सुधारणा करणे चालु आहे. तीन महिन्यात या सुधारणा पुर्ण होतील.<br>मानीव अभिहस्तांतरण सेवेचा eQJ प्रणालीत समावेश केला आहे. नवीन ५ मॉड्युल्स ३ महिन्यात पुर्ण होईल. | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | सहकार विभागाचे संगणकीकरण | पूर्ण | सहकार आयुक्तालय स्तरावरील<br>• ई-ऑफीस | - |
| ३ | | पूर्ण | सहकार आयुक्तालय स्तरावरील<br>E-Quasi Judicial Software - Software Development Process सूरु असून Project testing Phase मध्ये आहे - दि. ०१ मे, २०२५ रोजी कार्यान्वित होईल. | |
| ४ | सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नियमांत सुधारणा करणे | पूर्ण | सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नियमांचा मसुदा दि. १५.०४.२०२५ रोजी प्रसिध्द झालेला आहे. त्यावर हरकती सूचना आल्यानंतर अंतिम नियम प्रसिध्द केले जातील. | |
| ५ | प्राथमिक कृषी पत पुरवठा सहकारी संस्थांचे कामकाज संगणकीय प्रणालीव्दारे करणे. | पूर्ण | दि.१९.०३.२०२५ पर्यंत एकुण ९५८९ संस्था Go Live करण्यात आल्या आहेत. दि. ३१ मार्च, २०२५ पर्यंत सर्व १२००० संस्था Go Live करण्याचे उद्दिष्ट आहे. - १०,०७० संस्था पूर्ण. उर्वरीत संस्था दि. ३०.११.२०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित | |
| ६ | संगणकीकरणासाठी नव्याने ३००० संस्थांचा समावेश करण्यासाठी केंद्र शासनास प्रस्ताव पाठविणे. | पूर्ण | संगणकीकरणासाठी नव्याने ३००० संस्थांचा समावेश करण्याकरीता दि. ०४.०३.२०२५ रोजी राज्य स्तरीय संनियंत्रण व अंमलबजावणी समिती (SLMIC) च्या बैठकीमध्ये केंद्र शासनास प्रस्ताव सादर | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | करण्याबाबत निर्णय झाला आहे. यानुषंगाने केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. | |
| ७ | प्राथमिक कृषी पत पुरवठा सहकारी संस्थांमार्फत १०० गोदामांची उभारणी करणे. | अपूर्ण | - | दि.१९.०३.२०२५ पर्यंत एकुण ८३ संस्थांचे DPR महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाकडे (MCDC)सादर करण्यात आले आहेत. त्यापैकी ९ संस्थांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी तत्वत: मान्यता दिली आहे. त्या संस्थांनी बँकांना आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर कर्ज वितरीत होऊन बांधकामास सुरवात होईल.<br>- ५२ बांधकाम पूर्ण. उर्वरीत १ वर्षात पूर्ण होणे अपेक्षित.१२ संस्थांचे कामकाज प्रगतीपथावर. |
| ८ | गटसचिवांसाठी नवीन नियम लागू करणे | पूर्ण | महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ यामध्ये नियम ५३अ व ५३ब यांचा समावेश करण्याच्या अनुषंगाने दि.२३.०४.२०२५ रोजी अंतिम नियम प्रसिध्द झाले आहेत. | |
| ९ | राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) कडून राज्यातील सहकार साखर कारखान्यांना मार्जिन मनी लोन | पूर्ण | राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed Through State Government) खेळत्या भांडवलासाठी रु. १०६०.७६ कोटी इतके मार्जिन मनी लोन ९ सहकारी साखर | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | उपलब्ध करुन देणे. | | कारखान्यांना वितरित करण्यास शासनाच्या दि.१०.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. (राष्ट्रीय सहकार विकास निगम यांनी कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना लि., कुडित्रे, ता. करवीर, जि. कोल्हापूर या कारखान्याची एसडीएफ आधुनिकीकरण आणि सहवीज निर्मिती कर्जाची परतफेड केली नसल्याने रु.२४,५५,९५,३१५/- ही रक्कम सदर कारखान्यास देय असलेल्या रु. १५३.४४ या रकमेतून वजा करुन घेतली आहे. तसेच, सदाशिवराव मंडलिक कागल तालुका सहकारी साखर कारखाना लि., सदाशिवनगर, हमिदवाडा, कौलगे, ता. कागल, जि. कोल्हापूर या कारखान्याने एसडीएफ ऊस विकास व इथेनॉल कर्जाची परतफेड केली नसल्याने रु.१९,२६,०९,८०४/- एवढी रक्कम सदर कारखान्यास देय असलेल्या रु. १३९.०० या रकमेतून वजा करुन घेतली आहे. | |
| | | अपूर्ण | - | साखर कारखान्यांच्या वजन काटयांची तपासणी करण्यासाठी साखर आयुक्तालयाचे दि.२१/११/२०२४, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | दि.१०/०१/२०२५ आणि दि.०३/०३/ २०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रादेशिक सहसंचालक (साखर) (सर्व) यांना पथकांचा पथक निहाय तपासणी अहवाल कळविण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. साखर आयुक्तालयाचे दि.१०/०२/२०२५ रोजीचे अर्ध शासकीय पत्रान्वये संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना कार्यवाहीबाबत कळविण्यात आले आहे. चालू हंगामात एकूण २०० कारखान्यापैकी **१४४** कारखान्यांचे वजनकाटे तपासणी झालेबाबत अहवाल प्राप्त झाला आहे. - ७२% पूर्ण झाले आहे. उर्वरीत काम ३ महिन्यात पूर्ण होईल.<br>(अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत कार्यवाही चालू आहे) |
| १० | पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण (EBP) कार्यक्रमांतर्गत ऑईल कंपन्यांना इथेनॉल पुरवठा करणे. | अपूर्ण | - | इथेनॉल वर्ष सन २०२४-२५ साठी केंद्र शासनाने राज्यातील साखर कारखान्यांना १२१ कोटी लिटर इथेनॉल पुरवठयाचा लक्षांक दिला आहे. त्यापैकी पहिल्या तिमाहीतील ५२.५५ कोटी लिटर पैकी फेब्रुवारी २०२५ अखेर ४५.२२ काटी लिटर इतका पुरवठा ऑइल मार्केटिंग कंपन्यांना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | करण्यात आला आहे. - पहिल्या तिमाहीतील लक्षांक ८६% पूर्ण. ऊसाचे गाळप ह्या हंगामात कमी झाल्यामुळे लक्षांक पूर्ण होऊ शकणार नाही. |
| ११ | राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ऊस तोडणी यंत्रांना अनुदान वितरीत करणे. | पूर्ण | १०० दिवसात करावयाच्या कृती कार्यक्रमान्वये राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत ऊस तोडणी यंत्र अनुदान २०० लाभार्थ्यांना अदा करण्यात येईल.<br>याबाबत राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत ऊस तोडणी यंत्रासाठी कृषी विभागाच्या दि.०८/०२/२०२५ रोजीचे पत्रान्वये सर्वसाधारण प्रवर्गासाठी रू.२०.०० कोटी आणि दि.११/०२/२०२५ रोजीचे पत्रान्वये अनुसूचित जाती साठी रू.१.०५ कोटी व अनुसूचित जमातीसाठी रू.०.९७ कोटी प्राप्त झाले आहे. तसेच कृषी विभागच्या दि.०८/०२/२०२५ व दि.११/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त निधीतून ६४ लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम रू.२१.५६ कोटी अदा करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.<br>तसेच कृषी विभागाच्या दि.२१/०३/ २०२५ पत्रान्वये सर्वसाधारण प्रवर्गासाठी | - |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | रू.३२.२५०० कोटी, अनुसूचित जाती साठी रू.१४.४७५८ कोटी व अनुसूचित जमातीसाठी रू.२.४५०० कोटी प्राप्त झाले आहे. प्राप्त निधीतून १४१ लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम रू.४७.५७ कोटी अदा करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.<br>वरीलप्रमाणे १०० दिवसात करावयाच्या कृती कार्यक्रमानुसार राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत ऊस तोडणी यंत्र अनुदान प्रकल्पान्वये एकूण २०५ लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम अदा करण्याबाबतची साखर आयुक्तयालय स्तरावरील कार्यवाही पूर्ण झाली आहे. | |
| १२ | ऊसाचे क्षेत्र व ऊस उत्पादनाचा अचूक अंदाज घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब | पूर्ण | ऊसाचे क्षेत्र व ऊस उत्पादनाचा अचूक अंदाज घेण्यासाठी साखर आयुक्तालयाने मिटकॉन या संस्थेशी सामंज्यस करार केलेला आहे. त्यानुसार गाळप हंगाम २०२४-२५ साठी ऊसाचे क्षेत्र व ऊस उत्पादनाचा दि.०१ /०२ /२०२५ ते २८/०२/२०२५ पर्यंतची आकडेवारीचा सविस्तर अहवाल मिटकॉन मार्फत दि.१५/०३/२०२५ पर्यंत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर अहवाल मिटकॉन मार्फत साखर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आयुक्त कार्यालयाला सादर करण्यात आला आहे. | |

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक ५७] बुधवार, एप्रिल २३, २०२५/वैशाख ३, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १५४**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ एप्रिल, २०२५.

## अधिसूचना

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.**

क्रमांक सनिनि- १५२४/ प्र.क्र. ११०/ १३स.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) च्या कलम १६५ च्या पोट-कलम (१) व (२) याद्वारे प्रदान केलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण, भाग चार-ब, दिनांक ८ ऑक्टोबर, २०२४ यामध्ये प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक सनिनि- १५२४/ प्र.क्र. ११०/ १३स, दिनांक ८ ऑक्टोबर, २०२४ अन्वये मागविलेले आक्षेप व सूचना विचारात घेतल्यानंतर, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. सदर नियमांना महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा ) नियम, २०२५, असे म्हणावे.

"५३अ. सहकारी जिल्हा संवर्ग सेवा योजन निधीची स्थापना व निधीस द्यावयाच्या वार्षिक अंशदानाची कार्यपद्धती.—

(१) जिल्हा देखरेख सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ६९अ खालील उपकलम (४) अन्वये गठीत "सहकारी जिल्हा संवर्ग सेवायोजन निधी" या नावाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत बँक खाते सुरू करेल.

(२) कलम ६९अ चे उपकलम (५) अन्वये सहकारी जिल्हा संवर्ग सेवा योजन निधीस द्यावयाचे अंशदान खालीलप्रमाणे राहील :—

(अ) प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था, मागील वर्षीच्या वार्षिक वेतनाच्या आधारे, संस्थेवर जिल्हा देखरेख सहकारी संस्थेकडील प्रतिनियुक्तीवर काम करणाऱ्या सचिवाच्या १५ महिन्यांच्या वेतनाइतपत व अन्य देय भत्याइतपत रक्कम, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अंशदान हिरश्याची रक्कम वजा करून सहकारी जिल्हा संवर्ग सेवा योजन निधी या खात्यात जमा करील.

परंतु जिल्हा देखरेख सहकारी संस्थेने सचिवास एकापेक्षा अधिक संस्थेत नेमणूक केली असल्यास उपरोक्त अंशदानाची रक्कम सदरच्या संस्थांमध्ये त्यांच्या आर्थिक स्थितीनुसार विभागण्यात येईल.

(आ) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित या बँकेव्यतिरीक्त इतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका प्रतीवर्षी दि. ३० सप्टेंबर रोजीच्या प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थामार्फत वितरित अल्पमुदत शेतीकर्जाच्या व बिगर शेती कर्जाच्या एकूण येणे रकमेवर तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांमार्फत वितरित व दिनांक १ ऑक्टोबर रोजीच्या मध्यमुदत शेती मागणी कर्जावर ०.१५ टक्के दराने अंशदान जमा करतील.

परंतु ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थामार्फत वितरीत अल्प मुदत शेती कर्जाचा व्यवहार बँकेच्या बिगर शेती कर्ज व्यवहारापेक्षा जास्त आहे अशा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी या अंशदानासाठी बिगर शेतीकर्ज विचारात घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) सहकारी जिल्हा संवर्ग सेवायोजन निधीस द्यावयाचे अंशदान प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तिच्या आर्थिक स्थितीनुसार एक रकमी अथवा दरमहा किंवा त्रैमासिक हप्त्याने स्वनिधीतून भरणा करील. याप्रमाणे अंशदानाचा भरणा करताना संस्था तथा बँक मागील आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष वसूल झालेल्या कर्जामधील पीक कर्जासाठीच्या दोन टक्के व्याज गाळ्याच्या व मध्यम मुदत कर्जाच्या बाबतीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्ज धोरणानुसार असणारा व्याज गाळा विचारात घेईल.

(४) जिल्हा देखरेख सहकारी संस्थेस संलग्न असलेली प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संवर्ग सेवायोजन निधीमध्ये जमा करावयाची अंशदानाची रक्कम प्रतिवर्षी ३१ डिसेंबर पूर्वी भरणा करेल.

(५) प्रत्येक वर्षाच्या अखेरीनंतर येणाऱ्या ३१ ऑक्टोबर पूर्वी प्रत्येक प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक त्यावर्षी द्यावयाच्या अंशदानाची रक्कम ठरविण्यासाठी आवश्यक असणारी माहिती संबंधीत जिल्हा देखरेख सहकारी संस्थेस पुरवील. संबंधित देखरेख संस्था या माहितीची छाननी करील व त्या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेने तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने द्यावयाची त्या वर्षाच्या अंशदानाची तसेच अंशदान थकबाकीची रक्कम निश्चित करेल. जिल्हा देखरेख सहकारी संस्था प्रतिवर्षी ३१ डिसेंबरपूर्वी निश्चित केलेल्या अंशदानाची मागणी करण्याबाबतची नोटीस प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर बजावील. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक त्या वर्षासाठी देय असणारे अंशदान संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील "सहकारी जिल्हा संवर्ग सेवायोजन निधी" या खात्यात जमा करील.

(६) प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेमार्फत सदर निधीमध्ये द्यावयाचे अंशदान भरणा न केल्यास संबंधित जिल्हा देखरेख सहकारी संस्थेस संबंधित संस्थेवर प्रतिनियुक्ती द्वारे नियुक्त केलेल्या सचिवास परत बोलविता येईल.

(७) कोणतीही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लगत पूर्वीच्या पोटनियमात तरतूद केल्याप्रमाणे वार्षिक अंशदान देण्यात कसूर करील त्याबाबतीत, जिल्हा देखरेख सहकारी संस्था याबाबतचा अहवाल निबंधकास सादर करील.

(८) वरील उपनियम (४) मध्ये नमूद केल्याप्रमाणे अंशदानाची रक्कम भरणा करणाऱ्या संस्थांच्या सचिवांचे वेतन या निधीमधून केले जाईल.

(९) सदरचे नियम हे राज्यातील सर्व प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था तसेच मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके व्यतिरीक्त इतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना लागू राहतील.

५३ब. सचिवांची भरती :—

जिल्हा देखरेख सहकारी संस्था प्राधान्यक्रमाने प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थेने जिल्हास्तरीय समितीच्या पूर्व मान्यतेने नियुक्त केलेल्या सचिवांमधून नामनिर्देशनाद्वारे अथवा सरळसेवेद्वारे सचिवांची भरती करेल. शासन नेमणूक करावयाच्या सचिवांची संख्या, त्यांची शैक्षणिक अर्हता व अनुभव, भरती व नामनिर्देशनाची कार्यपद्धती आणि सेवेच्या शर्तीबाबत सर्वसाधारण किंवा विशेष मार्गदर्शक तत्वे विहीत करेल.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. राजगोपाल देवरा,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENT

Mantralaya (Annex), Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 23rd April 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

No. Sanini 1524/ C.R.110/13C.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 165 of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 (Mah. XXIV of 1961), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961, after the same having been previously published as required by sub-section (*3*) of section 165 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Co-operative Societies (Amendment) Rules, 2025.

2. In the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961 (hereinafter referred to as "the principal Rules") after rule 53, the following rules shall be inserted, namely :—

"53A. Establishment of Co-operative District Cadre Employment Fund and Manner of annual contribution to be made to the fund.—

(1) The District Supervision Co-operative Society shall open an account in the name of the "Co-operative District Cadre Employment Fund" established by it under sub-section (*4*) of section 69A of the Act, in the District Central Co-operative Bank.

(2) The rate of contribution payable to the Co-operative District Cadre Employment Fund under sub-section (*5*) of section 69A shall be as follows, namely :—

(*a*) The Primary Agricultural Credit Society shall on the basis of the previous years annual salary of the Secretary deputed by the District Supervision Co-operative Society, after deducting share of District Central Co-operative Bank in the contribution, contribute to the Co-operative District Cadre Employment Fund fifteen months' salary and other payable allowances to the Secretary :

Provided that, if the District Supervision Co-operative Society has nominated one secretary on more than one Primary Agricultural Credit Societies, then the above contribution shall be divided amongst those societies based upon their financial position.

(*b*) All District Central Co-operative Banks, excluding the Mumbai District Central Co-operative Bank Limited shall deposit the contribution in the Co-operative District Cadre Employment Fund at the rate of 0.15 per cent. of short term agricultural and non-agricultural loans disbursed through Primary Agricultural Credit Societies and which are outstanding as on 30th September each year and that of medium term loans, disbursed through Primary Agricultural Credit Societies, due for recovery as on the 1st October in each year :

Provided that, the District Central Co-operative banks having short term agricultural loans disbursed through Primary Agricultural Credit Societies more than that of non-agricultural loans shall not be required to consider non-agricultural loans for the purpose of such contribution.

(3) The contribution to be paid to the Co-operative District Cadre Employment Fund shall be paid from the own funds in *lump-sum* or in monthly or quarterly instalments depending on the financial position of the Primary Agricultural Credit Society or the District Central Co-operative Bank, as the case may be. While paying the contribution, the society or the bank will take into consideration the two per cent. interest margin available on crop loans actually recovered in the previous financial year and in case of medium term loans the available interest margin as per the loan policy of the District Central Co-operative Bank.

(4) The Primary Agricultural Credit Society affiliated to District Supervision Co-operative Society as well as District Central Co-operative Bank shall pay the annual contribution in the District Cadre Employment Fund before 31st December every year.

(5) The Primary Agricultural Credit Societies as well as the District Central Co-operative Bank, before 31st October following the end of each year, shall furnish to the District Supervision Co-operative Society the information necessary for determining the amount of contribution to be paid for that year. After receiving such information, the concerned supervision society will scrutinize the same and determine the amount of contribution and arrears of contribution for that year to be paid by the Primary Agricultural Credit Society and by the District Central Co-operative Bank. Before 31st December, the District Supervision Co-operative Society shall serve a notice of demand for payment of fixed contribution on the Primary Agricultural Credit Society and the District Central Co-operative Bank. The Primary Agricultural Credit Society and District Central Co-operative Bank shall pay the amount of contribution due for that year in the "Co-operative District Cadre Employment Fund" account in the District Central Co-operative bank.

(6) In case of non-payment of contribution to the said fund by the Primary Agricultural Credit Society, the Secretary appointed on deputation may be recalled by the concerned District Supervision Co-operative Society.

(7) In case, any District Central Co-operative Bank defaults in paying the annual contribution as provided in the sub-rule (2), the District Supervision Co-operative Society shall submit a report thereof to the Registrar.

(8) The salary of the Secretaries of the societies paying the annual contribution as mentioned in sub-rule (4) above shall be paid from this fund.

(9) The provisions of this rule shall be applicable to all the Primary Agricultural Credit Societies and District Central Co-operative Banks other than Mumbai District Central Co-operative Bank.

53B. Recruitment of Secretaries.—

The District Supervision Co-operative Society shall recruit secretaries by nomination primarily from amongst the secretaries appointed by Primary Agricultural Credit Societies with prior permission of District Level Committee or by direct recruitment. The Government may provide general or special guidelines for total number of secretaries to be appointed, their educational qualification and experience, recruitment and nomination procedure and service conditions.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. RAJGOPAL DEVARA,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.